# स्वप्नी पाहिले सद्गुरू साई

स्वप्नी पाहिले मी सद्गुरू साई
स्वप्नी दिसले मज सद्गुरू साई
गतजन्मीची मम पुण्याई
म्हणुनि भेटले सद्गुरू साई

संसारडोही होतो रमलो
मोह-मायेत होतो बुडालो
साईनाथे धरूनी मज करी
नेले मजला पैलतीरी
कृपा त्यांची मजवर भारी
स्वप्नी पाहिले मी सद्गुरू साई

या कलियुगा माझारी
कुणी कुणा ना, कधी विचारी
परि, परात्पर सद्गुरू साईनी
लाविले मजला परमार्थ मार्गी
कृपा त्यांची मजवर भारी
स्वप्नी पाहिले मी सद्गुरू साई

दुजियांचे कल्याण करणे
परहितास्तवे सदा धावणे
साई सद्गुरूंची वचने
गावे वाटे साईगुण गाणे
कृपा त्यांची मजवर भारी
स्वप्नी पाहिले मी सद्गुरू साई

– पद्‌माकर चित्रे
('बोल अंतरीचे' या कवितासंग्रहातून)